श्री. सप्तशृंगी आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, पंचवटी, नाशिक.
नवीन आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
गो.ते. रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
शासन निर्णय क्रमांक पीजीए १२१३/प्र.क्र.२९/१३/शिक्षण-२
दिनांक:- १३ ऑक्टोबर, २०१४

वाचा:- १) शासनाचे समक्रमांकित ना-हरकत प्रमाणपत्र, दिनांक २३.०४.२०१३.
२) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांचे पत्र क्र.आर. १४०११/२१/२०१३-ईपी (आयएम-१) व क्र. आर. १३०११/२९/२०१३-ईपी (आयएम-१), दिनांक ०१.१०.२०१४.

प्रस्तावना:- श्री. सप्तशृंगी आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, पंचवटी, नाशिक या महाविद्यालयात १) संहिता सिध्दांत, २) क्रिया शरीर, ३) द्रव्यगुण, ४) रसशास्त्र व भैजस्य कल्पना, ५) कौमारभृत्य ६) अगदतंत्र व ७) पंचकर्म या सात विषयात नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास संदर्भ क्र. (१) अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर संस्थेस संदर्भ क्र.(२) अन्वये केंद्र शासनाचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांनी सन २०१४-१५ ते सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षांकरीता उक्त सात विषयात प्रत्येकी ०६ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार या संस्थेस सन २०१४-१५ ते सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षांकरीता उक्त सात विषयात नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्र. (२) अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन शासन याद्वारे श्री. सप्तशृंगी आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, पंचवटी, नाशिक या संस्थेस सन २०१४-१५ ते सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षांकरीता १) संहिता सिध्दांत, २) क्रिया शरीर, ३) द्रव्यगुण, ४) रसशास्त्र व भैजस्य कल्पना, ५) कौमारभृत्य ६) अगदतंत्र व ७) पंचकर्म या सात विषयात प्रत्येकी ०६ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देत आहे:-

अटी व शर्ती:-

१) या आयुर्वेद महाविद्यालयातील संहिता सिध्दांत, क्रिया शरीर, द्रव्यगुण, रसशास्त्र व भैजस्य कल्पना, कौमारभृत्य, अगदतंत्र व पंचकर्म या विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार प्रत्येकी ०६ एवढी राहील.
२) राज्य शासन / केंद्र शासन / मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धत अवलंबिण्यात यावी.
३) शासकीय नियम/कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४) केंद्र शासन, भारतीय चिकीत्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७) शासकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

९) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१०) केंद्र शासनाने दिलेली सदर मान्यता ही सन २०१४-१५ ते सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षांकरीता असल्याने संस्थेने त्यानंतरचे विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाची तसेच त्या आधारे राज्य शासनाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

३. सदर आदेश केंद्र शासनाने संदर्भीत केंद्र शासनाच्या दिनांक ०१.१०.२०१४ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अंजली वि. अंभिरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.राज्यपालांचे सल्लागार, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
प्राचार्य, श्री. सप्तश्रृंगी आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, पंचवटी, नाशिक
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ एन एडेड प्रायव्हेट मेडिकल ॲण्ड डेंटल कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री.जी.हाऊस, ७५, मिंटरोड, फोर्ट, मुंबई-०१
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती / शिक्षण शुल्क समिती, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
निवडनस्ती (शिक्षण-२)

[illegible]

कायचिकित्सा, शल्यतंत्र सामान्य, स्त्रीरोग आणि प्रसुतीतंत्र या विषयाच्या नवीन आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्रमांक.पीजीए १२१६/प्र.क्र.१५७/शिक्षण-२
वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक:- १३/०९/२०१७

वाचा:-१) शासन पत्र क्रमांक पीजीए १२१५/सीआर १५७/शिक्षण-२, दिनांक २६/०४/२०१६

२) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/पीजी/१५३१, दिनांक १९/१२/२०१५

३) केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.आर.१४०११/२८/२०१६-ईपी (आयएम-१), दिनांक ०२/०९/२०१७

**प्रस्तावना**:- श्री सप्तश्रृंगी आयुर्वेद महाविद्यालय अॅन्ड हॉस्पीटल, कमल नगर, हिरावाडी, पंचवटी, नाशिक या संस्थेस 'कायचिकित्सा', 'शल्यतंत्र-सामान्य' व 'स्त्रीरोग आणि प्रसुतीतंत्र'अशा तीन विषयात नवीन आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास संदर्भ क्र. १ अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर संस्थेस संदर्भ क्र.३ अन्वये केंद्र शासनाचे आयुष मंत्रालय, नवी दिल्ली यांनी सन २०१७-१८ ते २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात उक्त विषयात प्रत्येकी ०६ इतक्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार या संस्थेस सन २०१७-१८ ते २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात उक्त तीन विषयात आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:-केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन श्री सप्तश्रृंगी आयुर्वेद महाविद्यालय अॅन्ड हॉस्पीटल, कमल नगर, हिरावाडी, पंचवटी, नाशिक या संस्थेस सन २०१७-१८ ते २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात 'कायचिकित्सा', 'शल्यतंत्र-सामान्य', 'स्त्रीरोग आणि प्रसुतीतंत्र' या विषयात प्रत्येकी ०६ इतक्या प्रवेशक्षमतेसह नवीन आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

**अटी व शर्ती**:-

१. या आयुर्वेद महाविद्यालयातील 'कायचिकित्सा', 'शल्यतंत्र-सामान्य', 'स्त्रीरोग आणि प्रसुतीतंत्र' या विषयातील आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार प्रत्येकी ०६ एवढी राहिल.

२. राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय/ मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३. शासकीय नियम/कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल.

४. केंद्र शासन, भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्याक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट, १९८७ (महाराष्ट्र अॅक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६. सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

S.S.A.M & H NASHIK
P.G. DEPARTMENT
Inward No...70 Date : 14/9/17
Signature : [signature]

७. [illegible] वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्यांच्या सेवा संस्थेत [illegible] घेता येणार नाहीत.

८. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नये.

९. संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरणाकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

१०. केंद्र शासनाने दिलेली परवानगी सन २०१७-१८ ते २०१८-१९ या वर्षासाठी असल्याने संस्थेने पुढील वर्षाचे (सन २०१९-२०२०) विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाच्या परवानगीचे नूतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहिल.

११. केंद्रशासनाच्या संदर्भाधीन क्र. ३ वरील पत्रात नमूद अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून प्रस्तुत मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर आदेश हे केंद्र शासनाने संदर्भाधीन दिनांक ०२/०९/२०१७ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

१३/०९

(अजित सासुलकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
मा.सचिव,भारत सरकार,आयुष मंत्रालय,आयुष भवन,बी ब्लॉक,जीपीओ कॉम्पलेक्स,आयएनए,नवी दिल्ली-११० ०२३.
मा.निबंधक, भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, ६१-६५, इन्स्टिटयूशनल एरिया, जनकपुरी, नवी दिल्ली-११० ०५८.
मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
संचालक, आयुष संचालनालय,मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
प्राचार्य, श्री सप्तश्रृंगी शिक्षण संस्था, नाशिकचे श्री सप्तश्रृंगी आयुर्वेद महाविद्यालय ॲन्ड हॉस्पीटल, कमल नगर, हिरावाडी, पंचवटी, नाशिक
अधिष्ठाता, सर्व शासकीय आयुर्वेद महाविद्यालये
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण/शुल्क नियामक प्राधिकरण, २०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
निवडनस्ती (शिक्षण-२)